लोकमत




रावेप (रुरल ॲग्रीकल्चरल वर्क एक्सपिरिअन्स प्रोग्राम) अंतर्गत 'ॲग्री स्प्राउट्स' या मुलींच्या गटाने केपे तालुक्यातील मळकर्णे सरकारी विद्यालयात विद्यार्थ्यांसोबत कृषी दिन साजरा केला.

# मळकर्णे सरकारी विद्यालयात अभिनव पद्धतीने कृषी दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मळकर्णे** : रावेप (रुरल ॲग्रीकल्चरल वर्क एक्सपिरिअन्स प्रोग्राम) अंतर्गत 'ॲग्री स्प्राउट्स' या मुलींच्या गटाने केपे तालुक्यातील मळकर्णे सरकारी विद्यालयात विद्यार्थ्यांसोबत कृषी दिन अभिनव पद्धतीने साजरा केला.

सुळकर्णे केपे येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा हा गट आहे. राजन शेळके यांनी मुलांना 'आजच्या काळात शेतीचे महत्त्व' याविषयावर व्याख्यान दिले. मुख्याध्यापिका सिंधू प्रभुदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या गटाने शाळेच्या आवारात झाडेही लावली.

रावेपचे चेअरमन डॉ. राकेश कवळे यांनी जमिनीसाठी सेंद्रिय खताचे महत्त्व याविषयावर मार्गदर्शन केले. मुलांना घरच्या घरीच स्वत:चे कीचन गार्डन कसे करता येईल याबाबतही गटाने मार्गदर्शन केले.

Goa Main
Page No. 11 Aug 06, 2018
Powered by: erelego.com